# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०३/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## अवैध्यरीत्या गाई गौवंशाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दि. २२/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरेवरुन नॅशनल हायवे क्र. ४४ जबलपुर ते नागपुर जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी लावुन अवैध्य जनावरे वाहतुक कार्यवाही करीत असता वेळ सकाळी ०७/३० वा. दरम्यान एक मोठे वाहन भरधाव वेगाने जबलपुर कडुन नागपुर दिशेने येतांनी दिसले. सदर वाहन हे स्टाफचे मदतीने रोडचे कडेला थांबवुन सदर वाहनाची पाहणी केली असता एक आयसर कंपनीचे लाल रंगाचे वाहन ट्रक क्र. MH 40 GT 2865 असे असुन सदर वाहनात चालक आरोपी नामे– **१) फिरदौस मिर्जा अनवर बेग वय ३६ वर्षे, रा. हुनमान मंदीर, १३४ संगम नगर, पिली नदी उप्पलवाडी (नागपुर) सोबत २) विजय सखाराम मानेश्वर वय ३० वर्षे, रा. अंबीकानगर, डोरली छतरपुर ता. सिवनी जि. सिवनी (म.प्र)** यांनी आपले ताब्यातील वाहनात अतिशय आखुड नायलॉन दोराने एकावर एक रचुन कोणतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता काळे, पांढरे व लाल रंगाचे असे ०७ गाय, काळे, पांढरे व लाल रंगाचे एकुण ०७ गोरे, काळे, पांढरे व लाल रंगाचे एकुण ११ कालवड, काळा व पांढरा रंगाचा बैल ०२ असे एकुण २७ जिवंत जनावरे प्रत्येकी किंमती १०,०००/–रू प्रमाणे २,७०,०००/–रू असे गोवंश कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने वाहनासह २) आयसर कंपनीचे वाहन क्र. एम.एच.–४०/ जि. टी– २८६५ किंमती २०,००,०००/–रू. असा एकुण २२,७०,०००/–रू. चा मुद्देमाल वाहतूक करतांना मिळुन आल्याने सदर मुद्देमाल जप्त करून सदर गुन्हयातील आरोपी नामे–**१) फिरदौस मिर्जा अनवर बेग वय ३६ वर्षे, रा. हुनमान मंदीर, १३४ संगम नगर, पिली नदी उप्पलवाडी (नागपुर) सोबत मालक २) विजय सखाराम मानेश्वर वय ३० वर्षे, रा. अंबीकानगर, डोरली छतरपुर ता. सिवनी जि. सिवनी (म.प्र)** या दोन्ही इसमांविरुद्ध कलम २७९, ४२९, ३४, १०९ भादंवी सहकलम ११(१) (ड) प्राण्यांना निर्देयतेने वागविने प्रतिबंधक अधिनियम–१९६०, सहकलम–५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम– ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सहकलम–१८४ मो. वा. का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे देवलापार येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक राजेश पाटील, पोहवा रविंद्र मेश्राम, पोना शिवचरण नागपुरे, पोशि सचिन येळकर यांनी पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर